सकाळ दि 12/04/2023

# गोळीबार प्रकरणातील तिघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही, एक गावठी पिस्टल जप्त



**नांदेड :** प्रेमी युगुलावर गोळीबार करून लुटणा-या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्यांच्याकडील एक गावठी पिस्टल जप्त करण्यात आली. पत्रकार परिषदेत मंगळवारी पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी ही माहिती दिली.

**नांदेड, ता. ११ (बातमीदार) :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने प्रेमी युगुलावर गोळीबार करून लुटणा-या तिघांना अटक केली असून त्यांच्याकडील एक गावठी पिस्टल जप्त करण्यात आली आहे. याबाबतची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत मंगळवारी (ता. ११) सायंकाळी दिली.

असदवन शिवारात ग्रामिण तंत्रनिकेतनच्या पाठीमागे ता. तीन मार्च रोजी रात्री आठच्या सुमारास एका प्रेमी युगुलावर चोरट्यांनी गोळीबार करून चांदीची चेन व नगदी दोन हजार रूपये चोरुन नेले होते. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयातील आरोपींना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक व्दारकादास चिखलीकर यांना आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी आरोपींना पकडण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करून शोध सुरु केला होता. दरम्यान, मंगळवारी (ता. ११) पथकाला मिळालेल्या माहितीनुसार गुन्हयातील आरोपी ग्रामीण तंत्रनिकेतन ते वाघाळा, नांदेड जाणा-या रस्त्यालगतच्या पाण्याच्या टाकीखाली बसलेले आहेत. त्यावरून पथकाने त्या ठिकाणी सापळा रचला आणि राजेंद्र अरुणसिंह ठाकुर (वय ३२), अतिष जिवनसिंह ठाकुर ( वय २२, दोघेही रा. आकाशनगर, असदवन, विष्णुपुरी, नांदेड) आणि श्रीपाद ऊर्फ पियुष सुधाकर कदम ( वय १९, रा. वसमत, जि. हिंगोली, हल्ली मुक्काम असदवन) या तिघांना पथकाने ताब्यात घेवुन विचारपुस केली. त्यांनी हा गुन्हा केल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, आरोपी राजेंद्र ठाकुर याने गुन्हा करताना वापरलेली २० हजार रूपये किंमतीची गावठी पिस्टल जप्त करण्यात आली आहे. या तिघांना पुढील तपासकामी ग्रामीण पोलिस ठाण्यात देण्यात आले आहे. या तीन आरोपीताकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक व्दारकादास चिखलीकर, सहायक पोलीस निरिक्षक पांडुरंग माने, फौजदार सचिन सोनवणे, जसवंतसिंघ शाहु, माधव केंद्रे, कर्मचारी देवा चव्हाण, मोतीराम पवार, तानाजी येळगे, मारोती मोरे, महेश बडगु, चालक अर्जुन शिंदे व सायबर विभागाचे राजु सिटीकर यांनी पार पाडली.